# संरचना व पदाधिकारी

दि. १ मे १९६२ पुर्वी महाराष्ट्रात जनपद सभा अस्तित्वात होत्या. स्थानिक स्वराज्य संस्थांना विकासात सहभागी करून त्यांचा विकास करणे, विकासाच्या योजनेत स्थानिक लोकांना जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी करून घेणे व सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचे दृष्टिने महाराष्ट्र जिल्हा परिषद, आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ अन्वये महाराष्ट्रातील जिल्हयात १ मे १९६२ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची स्थापना करण्यात आली; जिल्हा परिषदा हया जिल्हयाच्या ठिकाणी व पंचायत समिती ही नगरपरिषद क्षेत्र वगळून तहसीलच्या ठिकाणी स्थापन करण्यात आल्या. त्यानुसार यवतमाळ जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामीण भागातील एकूण ७८ मतदार संघातुन लोकप्रतिनिधी निवडून दिले जातात. यामध्ये पदाधिकारी यांचा कार्यकाळ २ वर्ष ६ महिने व सदस्यांचा कार्यकाळ ५ वर्षा करिता आहे. जिल्हा परिषदेत निवडून आलेल्या सदस्यांमधून अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड केली जाते. राज्य शासनाकडून आय. ए. एस. कॅडरचे अधिकारी यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक केल्या जाते. जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील जनतेकरीता शासनाच्या तसेच जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या योजना राबविल्या जातात. जिल्हा परिषदेमध्ये खालील प्रमाणे ६ पदाधिकारी आहेत व नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सबंधीत विभागाच्या विषय समीतीचे ते अध्यक्ष किंवा सभापती आहेत.

- **मा. अध्यक्ष - जिल्हा परिषद, स्थायी समिती, जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभा**
- **उपाध्यक्ष - कृषी व पशूसंवर्धन विषय समिती,**
- **मा. सभापती - अर्थ व बांधकाम विषय समिती.**
- **मा. सभापती - शिक्षण व आरोग्य विषय समिती.**
- **मा. सभापती - समाजकल्याण विषय समिती.**
- **मा. सभापती - महिला व बाल कल्याण विषयसमिती.**

## पदाधिकारी

### जिल्हा स्तर

- अध्यक्ष
  - उपाध्यक्ष
    - विषय समिती सभापती
      - शिक्षण व आरोग्य
      - अर्थ व बांधकाम
      - कृषि व पशु संवर्धन
      - समाज कल्याण
      - महिला व बाल कल्याण

### तालुका स्तर

- सभापती पंचायत समिती
  - उप सभापती पंचायत समिती

### ग्राम पंचायत स्तर

- सरपंच
  - उप सरपंच


प्रशासन
जिल्हा स्तर
मुख्य कार्यकारी अधिकरी
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकरी
प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा)
खाते प्रमुख
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
समाज कल्याण अधिकारी
कृषी विकास अधिकारी
जिल्हा पशु संवर्धन अधिकारी
जिल्हा आरोग्य अधिकारी
कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
शिक्षणाधिकारी (निरंतर)
कार्यकारी अभियंता (बांधकाम)
कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)
सहाय्यक अधिकारी
प्रशासकीय कर्मचारी
तालुका स्तर
गट विकास अधिकारी
सहाय्यक अधिकारी
प्रशासकीय कर्मचारी